* कोशांतील कित्येक चुकलेले शब्दार्थ व त्यांचा खरा अर्थ खालीं देतों.

| शब्द. | चुकलेला अर्थ. | खरा अर्थ व शब्द |
|---|---|---|
| वजारतमाहा | आंग्र्यांची पदवी. | वजारतमाब, प्रधानस्थान. वजारतमाब ही पदवी इतर सरदारांनाहि असे. |
| माहोना | जासुदाचें नांव | महिन्याचा पगार. |
| कही | बिनी, सैन्याच्या आघाडीचे लोक | सैन्याला लागणाऱ्या सामानाच्या शोधार्थ हिंडणारी लष्करी मंडळी. |
| लब | जासूद | निरोप घेऊन जाणारी, नेण्या-आणण्यास जाणारी मंडळी. |
| गाहा करणें | तयारी करणें | एका जागेवर असणें. |
| स्वस्ताक्षरपणीं | स्वतः लिहिलेला | स्वस्थपणें लिहिलेलें. |
| मजुरा | मजरा ( ? ) | कृतार्थता. |
| गुजरात कुली | आणखी इसमांच्या | हुजरात कुली, सर्व हुजूरची फौज. |
| पैरवी | बंदोबस्त | पाठलाग, शोध. |
| आंगेजणी | पराक्रम | एकी करणें [ आंगेख्तन् to renew a confederacy ]. |
| दिंमत हुद्दे | हिंमत हुद्देकरी ( ? ) | उंट जलदीनें चालवणें=हुद्दा. |
| मुजाहीम | अडथळा ( नाम ) | गैरसोईचें ( विशेषण ). |
| हरोल होऊन | मूळ अर्थ सैन्याची पिछाडी ! सामील होऊन. | जलदी करून. |

| | | |
|---|---|---|
| धाराईत | उदक सोडून | धारादत्त. |
| निगादास्त | बंदोबस्त | राखण करणें. |
| विशदर्ये | रागानें | स्पष्टपणें. |
| अंगारक | आंग्रे | ताम्र, म्लेच्छ. |
| विजरे | पोर्तुगीज गवर्नर ( ? ) | पोर्तुगीज व्हाइसराय. |
| बेदरका | बेदरकार असा शब्द असावा, याचा अर्थ माणसें वगैरे देऊन | वाटाड्या. |
| बंद धरून नेणें | कैद करणें | गुलाम धरून नेणें. |
| गीर्दनवाई | चहूंकडचे ( ? ) | सैन्याच्या भोंवतालची जागा. |
| जराबाजरा | किरकोळ सामान | यत्किंचित्. |
| आमरफ्ती | व्यापार | आमद्रफ्ती, येणें जाणें. |
| फरातग | विक्री करणें | फरोक्त. |

कोशांतील असे शब्दार्थ आणीकहि चुकलेले आहेत. मूळांत तर वाचनाच्या इतक्या चुक्या आहेत कीं डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीला हें पुस्तक, माझ्या मतें, कायमचें लांछन झालें आहे. शब्दांचे वाटतील ते अर्थ देणें म्हणजे सोसायटींतील सभासद दुधखुळीं पोरें आहेत असेंच ठरविणें आहे ! माहोना हें जासुदाचें नांव आहे हें विद्वद्वर्य रा० पारसनिस यांस कोणत्या कोशांत कळलें तें न कळे. इतका गचाळपणा ज्या सोसायटींत खपला जातो तिला एकाद्या भावी कवीच्या डन्शियाडांत अढळ पद खास मिळेल !